नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/१०/२०२४ (मंगळवार) दुपार

---

## पोस्टे उमरेड हद्दीतील गरदेपार पारधी बेडा परिसरात
## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. २२/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे उमरेड येथील गरदेपार पारधी बेडा येथे मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– मोरधन राजेराम राजपूत, वय ४५ वर्ष र.गरडेपार ता उमरेड जि. नागपूर** हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १)दोन प्लॅस्टिक डबकी मध्ये ८० लिटर मोहफुल गावठी दारू किंमती ८०००/–रु २) ५ प्लास्टीक ड्रम मध्ये मोहफुल रसायन सडवा प्रत्येकी २०० लिटर एकूण १००० लिटर प्रत्येकी लिटर ३५/– रुपये प्रमाणे एकूण किंमती ३५,०००/– रु , ३) ४ प्लास्टिक खाली ड्रम किंमत ४००० रू. ४) २ नग लोखंडी ड्रम मोहफुल साडवा रसायन २०० लिटर प्रती लिटर ३५/– रू प्रमाणे किंमत ७०००/– रु ५) २ नग लोखंडी ड्रम किंमत २४००/– रू ६) जळाऊ लाकूड किंमत ७००/– रू ७) दारु गाळण्याचे इतर साहित्य किंमत २०००/– रू असा एकूण किंमत ५९,१००/– रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले. वर नमूद आरोपी विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोउपनि बट्टुलाल पांडे, पोहवा मयुर ढेकले, पोहवा आशिष भुरे, पोशी निलेश इंगुळकर, पोशी रोहीत आडे, चापोशी आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

# प्राणांतिक अपघात

**पोस्टे कोंढाळी:—** अंतर्गत मौजा पांजरा गोंविद शिवार येथे दि. २१/१०/२०२४ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुजीत सुधाकर मरस्कोल्हे, वय २५ वर्ष रा. धानोली (कवडस) ता. हिंगणा जि. नागपुर याचा मोठा भाउ **मृतक नामे— अनिकेत मरसकोल्हे वय २८ रा. धानोली (कवडस)** येथुन बाजारगाव येथे जात असतांना कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन ठोस मारल्याने फिर्यादीच्या भावाची मोटारसायकल असंतुलित होवुन खड्डयात जावुन पडल्याने फिर्यादीच्या भावाच्या डोक्याला व डावे डोळयाचे वर मार लागुन जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कोंढाळी येथे अज्ञात वाहन चालकाविरूद्ध कलम २८१, १०६(१) बी.एन.एस. अन्वये गुन्हा नोंद केला असुन अज्ञात वाहन चालकाचा शोध कोंढाळी पोलीस घेत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर